आकाशवाणी मुंबई

प्रादेशिक बातमीपत्र - संध्याकाळी ७.०० वाजता

१ सप्टेंबर २०२४ -रविवार

**ठळक बातम्या**

- सर्वोच्च न्यायालयाच्या नवीन ध्वज आणि बोधचिन्हाचं राष्ट्रपतींच्या हस्ते अनावरण
- विधी आणि न्याय क्षेत्रात महिलांचा वाढता सहभाग भारतीय न्याय व्यवस्था अधिक सुदृढ आणि बळकट असल्याचं द्योतक आहे असं उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचं प्रतिपादन
- मालवणच्या राजकोट किल्ल्यावर छत्रपती शिवाजी महाराजांचा पुतळा पडल्याच्या घटनेचा निषेध करण्यासाठी महाविकास आघाडीचं मुंबईत आंदोलन/ मविआच्या निषेधार्थ भाजपाचंही आंदोलन
- ऑगस्ट महिन्यात भारतीय भांडवली बाजारात २५ हजार कोटी रुपयांहून अधिक परदेशी गुंतवणूक

  **आणि**

- राज्यात अनेक भागात पुन्हा पावसाचा जोर /आज आणि उद्यासाठी यवतमाळ, वाशिम, अमरावती, नांदेड, हिंगोली आणि परभणी या जिल्ह्यांना रेड अलर्ट

**<><><><><>**

भारताच्या सर्वोच्च न्यायालयानं स्थापनेपासून गेल्या ७५ वर्षांमध्ये जगातल्या सर्वात मोठ्या लोकशाहीच्या न्यायव्यवस्थेचा पहारेकरी म्हणून अमूल्य योगदान दिलं आहे, असं प्रतिपादन राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी केलं आहे. सर्वोच्च न्यायालयाच्या अमृत महोत्सवी वर्षानिमित्त आयोजित जिल्हास्तरीय न्यायपालिकेच्या दोन दिवसांच्या राष्ट्रीय परिषदेच्या समारोप सत्रात त्या बोलत होत्या. सर्वोच्च न्यायालयाने भारतीय न्यायशास्त्राचं स्थान उंचीवर नेऊन ठेवल्याचं

सांगून यात योगदान देणाऱ्या सर्वांचा गौरवपूर्ण उल्लेख राष्ट्रपती मुर्मू यांनी केला. सर्वोच्च न्यायालयाचं नवं बोधचिन्ह आणि ध्वजाचं अनावरण करून आनंद झाल्याची भावना त्यांनी व्यक्त केली.

यतो धर्मस्ततो जयः या बोधवाक्याप्रमाणे, न्याय आणि अन्यायाचा निर्णय देणारी सगळी न्यायालयं धर्मक्षेत्रं आहेत, न्यायाप्रति आस्था आणि श्रद्धा आपल्या परंपरेचा एक भाग आहे, असं त्या म्हणाल्या. सरन्यायाधीश न्यायमूर्ती डॉ. धनंजय चंद्रचूड यांनीही या सत्राला संबोधित केलं. जिल्हास्तरीय न्यायपालिका परिषदेमुळे न्यायपालिकेच्या आत्तापर्यंतच्या प्रवासाकडे तटस्थपणे बघण्याची आणि भविष्यात कोणत्या दिशेने आपल्याला जायचं आहे, हे ठरवण्याची प्रामाणिक संधी आपल्याला मिळाली, असं प्रतिपादन त्यांनी केलं. राष्ट्रीय एकात्मतेचा विचार करून स्थानिक भेदभाव, राज्य केंद्रित निवड यांच्या मर्यादा पार करून पुढे जाण्याची, जिल्हास्तरीय न्यायपालिका अधिक व्यापक, सर्वसमावेशक करण्याची हीच वेळ असल्याचं मतही त्यांनी व्यक्त केलं.

**<><><><><>**

विधी आणि न्याय क्षेत्रात महिलांचा सहभाग वाढणं ही सकारात्मक बाब असून, भारतीय न्याय व्यवस्था अधिक सुदृढ आणि बळकट असल्याचं ते द्योतक आहे, असं उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी म्हटलं आहे. छत्रपती संभाजीनगर इथल्या महाराष्ट्र राष्ट्रीय विधी विद्यापीठाच्या मुलींच्या वसतीगृहाचं उद्घाटन आज फडणवीस यांच्या हस्ते झालं, त्यावेळी ते बोलत होते.

मुंबई उच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती मंगेश पाटील, न्यायमूर्ती रविंद्र घुगे, राज्याचे महा अधिवक्ता डॉ. बिरेंद्र सराफ, विद्यापीठाचे प्रभारी कुलगुरु ए.

लक्ष्मीनाथ, खासदार डॉ. भागवत कराड यांच्यासह विधी आणि न्याय क्षेत्रातले विविध मान्यवर यावेळी उपस्थित होते.

उत्तम न्याय व्यवस्थेमुळे गुंतवणूक प्रक्रिया ही कायदेशीररित्या होण्याचा विश्वास असल्यानं आपल्या देशात येण्यास गुंतवणूकदार उत्सूक असतात, त्याचंच फलित म्हणून आपण जगातली सर्वोत्कृष्ट अर्थव्यवस्था होण्याकडे वाटचाल करत असल्याचं फडणवीस यावेळी म्हणाले. न्यायदानाची प्रक्रिया ही अधिकाधिक तंत्रस्नेही आणि लोकाभिमुख करण्यात आपण योग्यदिशेनं पावले टाकत असल्याचं त्यांनी सांगितलं.

**<><><><><>**

शालेय विद्यार्थ्यांमध्ये पोलिसांबाबत विश्वास निर्माण करण्याच्या हेतूनं सोलापूर शहर पोलीस आयुक्तालयातर्फे पोलीस काका आणि पोलीस दीदी हा उपक्रम राबवण्यात येणार आहे. काल यासंदर्भात पोलीस अधिकाऱ्यांची बैठक झाली. या उपक्रमाठी नियुक्त असलेले ८ पोलीस अधिकारी आणि २३ अंमलदार या बैठकीला उपस्थित होते. शिक्षक आणि शाळेतले इतर कर्मचारी, शिपाई यांची माहिती ठेवणं, शाळेतल्या मुलांच्या सुरक्षेसाठी काय उपाययोजना आहेत याबाबत जाणून घेण्याच्या सूचना या बैठकीत देण्यात आल्या.  अधिक माहिती आमच्या वार्ताहराकडून....

**होल्ड--व्हाईस कास्ट-सोलापूर पीटीसी**

**<><><><><>**

मालवणच्या राजकोट किल्ल्यावर छत्रपती शिवाजी महाराजांचा पुतळा पडल्याच्या घटनेचा निषेध करण्यासाठी महाविकास आघाडीनं आज मुंबईत

आंदोलन केलं. शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे प्रमुख उद्धव ठाकरे, खासदार अरविंद सावंत, **राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे अध्यक्ष खासदार शरद पवार,** खासदार सुप्रिया सुळे, अनिल देशमुख, काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष नाना पटोले, पृथ्विराज चव्हाण, आमदार भाई जगताप, छत्रपती शाहू महाराज यांच्यासह महाविकास आघाडीच्या नेते आणि कार्यकर्त्यांनी हुतात्मा चौकात जमून सरकारचा निषेध केला. तिथून मोर्चा काढून गेटवे ऑफ इंडियापर्यंत गेले आणि तिथल्या छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्याजवळ त्यांनी आंदोलन केलं. या आंदोलनाला पोलिसांनी परवानगी नाकारली होती. मोठा बंदोबस्त या परिसरात तैनात करण्यात आला होता. दरम्यान, नांदेडमध्ये विधानपरिषदेचे विरोधी पक्षनेते अंबादास दानवे यांच्या नेतृत्वात आंदोलन करण्यात आलं.

**<><><><><>**

विरोधकांच्या पायाखालची वाळू सरकली असून त्यांना पराभव दिसत आहे, अशी टीका मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी मुंबईत वार्ताहरांशी बोलताना केली आहे. मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेच्या यशामुळे परिस्थिती बदलली असल्याचा दावा त्यांनी केला. उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी महाविकास आघाडीचं आंदोलन पूर्णपणे राजकीय असल्याची टीका छत्रपती संभाजीनगर इथं वार्ताहरांशी बोलताना केली. दरम्यान, महाविकास आघाडीच्या आंदोलनाला प्रत्युत्तर म्हणून भाजपानेही आज राज्यात ठिकठिकाणी आंदोलन केलं.

**<><><><><>**

छत्रपती शिवाजी महाराजांचा पुतळा कोसळल्याच्या घटनेचं राजकारण होत असून हा प्रकार महाराष्ट्रासाठी दुर्दैवी आहे. अशा घटनेचं राजकारण करणाऱ्यांना राज्याची जनता घरी बसवेल, असं मराठा आरक्षण आंदोलनकर्ते मनोज जरांगे

पाटील आज राजकोट इथे म्हणाले. जरांगे यांनी दुर्घटनाग्रस्त पुतळ्याची पाहणी केली, त्यावेळी ते बोलत होते. वाढवण बंदराबाबत आपण माहिती घेत असून सरकारने स्थानिकांना रोजगार उपलब्ध करून द्यावा, अशी मागणीही जरांगे यांनी यावेळी केली.

<><><><><>

परदेशी गुंतवणूकदारांनी सलग तिसऱ्या महिन्यात आपल्या गुंतवणुकीचा ओघ कायम ठेवला असून ऑगस्ट महिन्यात भारतीय भांडवली बाजारात २५ हजार कोटी रुपयांहून अधिक गुंतवणूक केली आहे. परकीय चलनसाठा विषयक आकडेवारीनुसार ऑगस्ट महिन्यात परदेशी गुंतवणूकदारांनी समभाग बाजारपेठेत ७ हजार ३२० कोटी रुपये तर ऋण बाजारपेठेत १७ हजार ९६० कोटी रुपयांची गुंतवणूक केली आहे. परदेशी गुंतवणूकदारांनी यावर्षात आतापर्यंत भारतीय भांडवली बाजारपेठेत एकूण दीड लाख कोटी रुपये गुंतवले आहेत.

<><><><><>

राज्यपाल सी पी राधाकृष्णन यांच्या हस्ते आज देशातल्या ५० युवा नादस्वरम कलाकारांना शिष्यवृत्तीचे धनादेश प्रदान करण्यात आले. मुंबईत झालेल्या 'नादस्वर उत्सव' या कार्यक्रमात राज्यपालांच्या हस्ते युवा आणि होतकरू नादस्वरम वादकांना प्रत्येकी १ लाख रुपयांची शिष्यवृत्ती प्रदान करण्यात आली. यावेळी राज्यपालांच्या हस्ते प्रसिद्ध नादस्वर वादक शेषमपट्टी शिवलिंगम यांना श्री षण्मुखानंद नादस्वरम चक्रवर्ती संगीत कला विभूषण जीवन गौरव पुरस्कार प्रदान करण्यात आला.

इलेक्ट्रॉनिक स्वरवाद्यांच्या वाढत्या प्रसारामुळे नादस्वरम हे ध्वनी वाद्य हळुहळू विलुप्त होत आहे. या कलेचं जतन करण्याच्या हेतूनं दरवर्षी ५० नादस्वर कलाकारांना चक्रवर्ती टी एन राजा रथिनम पिल्लई फेलोशिप देण्यात येते.

**<><><><><>**

लोकप्रतिनिधी गृहातल्या भाषणांबद्दल राष्ट्रकुल संसदीय मंडळाच्या वतीनं दिल्या जाणाऱ्या "उत्कृष्ट भाषण" पुरस्कारासाठी धाराशिव इथले भाजपाचे माजी आमदार सुजितसिंह ठाकूर यांची निवड झाली आहे.

सुजितसिंह ठाकूर यांना वर्ष २०१८-१९ करता महाराष्ट्र विधानपरिषद "उत्कृष्ट भाषण" पुरस्कार जाहीर झाला आहे. ठाकूर यांनी मराठवाडा आणि धाराशिव जिल्ह्यातला सततचा दुष्काळ, पाणी टंचाई, कृष्णा खोऱ्यातलं मराठवाड्याच्या हक्काचं पाणी, शेतकरी कर्जमाफी, जलयुक्त शिवार, शेतीपंपाचा वीज प्रश्न, मराठवाड्याचं मागासलेपण, दरडोई कमी उत्पन्न, धाराशिव इथलं वैद्यकीय महाविद्यालय असे राज्यातल्या जनतेच्या जिव्हाळ्याचे अनेक विषय प्रभावीपणे सभागृहात मांडले होते. राष्ट्रपती द्रौपदी मुर्मु यांच्या हस्ते येत्या मंगळवारी मुंबईत विधानभवन इथं पुरस्कार वितरण होणार आहे.

**<><><><><>**

केंद्र सरकारच्या अस्मिता खेलो इंडिया उपक्रमामुळे मुली आणि महिलांचा क्रीडा स्पर्धांमधला सहभाग लक्षणीयरीत्या वाढत आहे, असं केंद्रीय क्रीडा राज्यमंत्री रक्षा खडसे यांनी सांगितलं. भारतीय खेल प्राधिकरण, खेलो इंडिया तसंच ज्युदो असोसिएशनच्या वतीनं 'अस्मिता खेलो इंडिया' या उपक्रमाअंतर्गत पश्चिम विभागाच्या वुमन्स लीग ज्युदो स्पर्धेला आज नाशिक इथं खडसे यांच्या प्रमुख उपस्थितीत सुरुवात झाली, त्यावेळी त्या बोलत होत्या.

**<><><><><>**

राज्यातल्या पोलीस पाटलांच्या गेल्या ४ महिन्यांच्या थकीत मानधनाचा प्रश्न मार्गी लावण्यासाठी उद्या शासननिर्णय निर्गमित करण्यात येईल, अशी ग्वाही उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिली आहे. पोलीस पाटील संघाच्या ८ व्या राज्यस्तरीय अधिवेशनात ते आज नागपूर इथं बोलत होते.

<><><><><>

राज्यात मान्सून पुन्हा एकदा सक्रिय झाल्याचं पाहायला मिळत आहे. आजही राज्यात अनेक भागात मुसळधार आणि अतिमुसळधार पावसाचा अंदाज वर्तवण्यात आला आहे. बंगालच्या उपसागरात तयार झालेल्या कमी दाब्याच्या पट्ट्याची तीव्रता वाढली आहे. त्यामुळे राज्यातल्या हवामानात मोठा बदल झाला असून पावसाची शक्यता वर्तवण्यात येत आहे. यामुळे राज्यात येत्या तीन दिवसांत बहुतांश भागात जोरदार पाऊस होईल. मध्य-महाराष्ट्रातही पावसाची शक्यता असून, घाटमाथ्यावरदेखील पुन्हा पावसाचा जोर वाढण्याची शक्यता आहे, हवामान खात्यानं वर्तवली आहे.

<><><><><>

येत्या दोन दिवसात राज्यात बहुतांश ठिकाणी पावसाची शक्यता असून तुरळक ठिकाणी मेघगर्जना आणि विजांच्या कडकडाटासह जोरदार पऊस पडेल असा अंदाज आहे. यवतमाळ, वाशिम, अमरावती, नांदेड, हिंगोली आणि परभणी जिल्ह्यांसाठी आज आणि उद्याकरता जोरदार पावसाचा रेड अलर्ट जारी केला आहे. जळगाव, छत्रपती संभाजीनगर, जाला, बीड, लातूर, अकोला, बुलडाणा, नागपूर आणि वर्धा जिल्ह्यांना ऑरेंज अलर्ट दिला आहे.

//<><><><><>//